महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,

द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलूंड, नवीन इमारत, ४ था मजला,

*बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलूंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१*

दुर. क्र. २६४७०२१६/२६४७१३५४/२६४७३०५५ वेब साईट :- mumbai.dvet.gov.in ई-मेल :- account.romumbai@dvet.gov.in

जा.क्र.- प्राकामु/लेखा/२०२५/का-२/३८८६ दिनांक- ११/०८/२०२५

प्रति ,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (सर्व)
उपसंचालक/प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (सर्व)
मुख्याध्यापक/कार्यालय प्रमुख, शासकीय तांत्रिक विद्यालय (सर्व)
सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार(तां), मु.प्र.अ.सू.केंद्र (सर्व)

विषय :- आयकर कपातीबाबत सूचना
संदर्भ :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.-१/कोषा-प्रशा-५, दिनांक १३ एप्रिल, २०१५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आयकर हा केंद्र शासनाच्या महसुली उत्पन्नाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्याअनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी यांनी उदगम कर वेळेवर कपात करुन केंद्र शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.-१/कोषा-प्रशा-५, दिनांक १३ एप्रिल, २०१५ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेल्या आयकराची विहीत विवरणपत्रे आयकर विभागात सादर करणेबाबत कार्यवाही विषद केलेली आहे. सदर शासन परिपत्रकातील परिशिष्ट-'अ' प्रमाणे आहरण व संवितरण अधिकारी यांनी कार्यवाही अनुसरावी.

तथापि, काही संस्था/कार्यालयातील कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी आयकर कपातीबाबत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे संपर्क न साधता वरिष्ठ कार्यालयांकडे विचारणा करीत असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयप्रमुख तथा आहरण व संवितरण अधिकारी यांनी खालील प्रमाणे कार्यवाही अनुसरावी.

१. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये विहीत कालमर्यादेत आयकर कपात करणेबाबत संबंधित संस्था/कार्यालयाचा आहरण व संवितरण अधिकारी हे जबाबदार असतात.
२. आयकर कायदा, १९६१ च्या कलम १९२ अंतर्गत दर महिन्याला अंदाजित एकूण उत्पन्नावर आधारित TDS वजा करणे.

३. अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून आयकर कपातीमध्ये नियमोचित सुट देण्याची मागणी केल्यास त्यासमर्थनार्थ आवश्यक पुरावे घेणे.

४. अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांच्या इतर उत्पन्नाची माहिती दिल्यास ती TDS मध्ये समाविष्ट करणे.

५. संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोणत्याही सबबीशिवाय Form १६ संबंधितांना विहीत कालमर्यादेत निर्गमित करणे.

६. सरकारकडे TDS भरून Form २४Q (त्रैमासिक रिटर्न) विहीत कालमर्यादेत भरणे.

७. आयकर विभागाच्या नियमानुसार व सूचनांप्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये आयकर वजातीची कार्यवाही न चुकता करण्यात यावी.

८. कर कपातीबाबत होणारा विलंब, कमी कर कपात व विहीत मुदतीत विवरणपत्रे आयकर विभागास सादर न करणे याकरीता आयकर कायद्यानुसार दंडाची व शिक्षेची तरतूद आहे, याची नोंद घ्यावी.

९. आयकर कपातीच्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी यांनी आपल्या स्तरावर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या तक्रारीचे निराकरण करावे व आयकराच्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे नियमोचित कार्यवाही अनुसरावी.

Nikam

(नि.आ.निकम)
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, मुंबई-८१

प्रत:- मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.